
## आवाज रयतेचा

नितीन गटाणी
९०७५०४७५०४

**महासत्ता ?**

महासत्तेकडे वाटचाल,
स्पष्टपणे दिसत आहे.
विकसित भारताची दिशा,
साहेबांच्या डोळ्यात खूपच आहे.
आयात शुल्काच घोंगडं,
अद्यापही भिजत आहे.
मारुतीच्या शेपटीसारखं,
दिवसेंदिवस वाढत आहे.






दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३७६ वा ● शुक्रवार, ता.०८ ऑगस्ट २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००





## ब्राह्मण समरसता परिषदेतून पानिपतला ब्राह्मण रणतीर्थ घोषित करण्याचा संकल्प

### श्रीमंत प्रभाकरभट्ट नारायणराव पेशव्यांची घोषणा

**कुरुक्षेत्र । रयत समाचार**

श्रावण पौर्णिमेच्या निमित्ताने कुरुक्षेत्र येथे आयोजित ब्राह्मण समरसता परिषदेत देशभरातील विविध ब्राह्मण समाज संघटनांनी एकत्र येत, ब्राह्मण समाजाच्या राजकीय आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी नवे धोरण आखले. या परिषदेत श्रीमंत प्रभाकरभट्ट नारायणराव पेशव्यांनी ठामपणे मांडणी करत पानिपतला ब्राह्मण रणतीर्थ म्हणून घोषित करण्याचा संकल्प केला. पेशव्यांनी आपल्या भाषणात दोन महान ब्राह्मण वीरांची आठवण करून दिली. पंडित हेमचंद्र भार्गव (हेमू विक्रमादित्य) आणि पंडित सदाशिवराव भाऊ (पेशवा). या दोघांनी पानिपतच्या रनात दिलेल्या बलिदानाचे स्मरण करत, पानिपत येथे त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी व्हावी, अशी मागणी केली. ''४० हजार ब्राह्मणांनी देशासाठी बलिदान दिले.

त्यांच्याच जनेऊ जळाल्यामुळे आजचे तथाकथित मूळनिवासी जिवंत आहेत,'' असे सडेतोड वक्तव्य त्यांनी केले. पेशव्यांनी अधोरेखित केलेले मुद्दे असे होते. ब्राह्मण समाजासाठी (ब्राह्मण आयडेंटिटी प्रोटेक्शन एक्ट) ची मागणी. देशभरातील १६ उपब्राह्मण समाजांना, जसे की गुसाई, जोगी, गोंड, डाकोळे, त्यागी आदी, एकत्र आणून १९% ब्राह्मण महासंघाची निर्मिती. उत्तर भारतात 'ब्राह्मण समरसता अभियान' चालवले जात असून, हे अभियान कुरुक्षेत्रपासून अमरकंटकपर्यंत विस्तारित केले जाणार आहे. मणिपूर, त्रिपुरा आणि सिक्कीममधील - ब्राह्मण समाजांनाही या अभियानात सामील करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या परिषदेत विविध ब्राह्मण समाजांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात यज्ञोपवीत, प्रवचन व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. पेशव्यांनी आवाहन केले की, ''जितकी हिस्सेदारी, तितकी भागीदारी'' या तत्त्वावर ब्राह्मणांनी एकत्र येऊन राजकीय आणि सामाजिक अधिकार मिळवण्यासाठी सज्ज व्हावे. पानिपत हे आता केवळ इतिहासाचे मैदान न राहता, सर्व ब्राह्मणांसाठी रणभूमी आणि प्रेरणास्थान व्हावे, हेच या परिषदेतून ठळकपणे समोर आले.

## अमेरिकेच्या ट्रम्प व्यापार आक्रमकतेचा भाकपाकडून निषेध

### भारताच्या स्वायत्ततेवर थेट हल्ला

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय सचिव मंडळाने काल ता. ७ ऑगस्ट २०२५ रोजी एक निवेदन जारी करत अमेरिकेच्या व्यापार आक्रमकतेचा तीव्र निषेध केला आहे. रशियासोबतच्या तेल व्यापाराचा बदला म्हणून भारतावर ५० टक्के दंडात्मक कर लादण्याच्या अमेरिकेच्या अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीची त्यांनी कडक शब्दांत टीका केली. ''ही कृती भारताच्या स्वायत्ततेवर थेट हल्ला असून, व्यापाराचे उघड शस्त्रीकरण आहे,'' असे पक्षाने स्पष्ट केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, ही आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली एक बहिष्कृत आणि क्षीण जागतिक व्यवस्था लादण्याचा क्रूर प्रयत्न आहे. याचा उद्देश स्वतंत्र राष्ट्रांना दबावाखाली आणणे आणि त्यांच्या आर्थिक व परराष्ट्र धोरणांवर बंधने घालणे आहे. पक्षाने म्हटले आहे की, जागतिक धोरणनिर्मितीवर कोणत्याही एका देशाचा, विशेषतः ट्रम्पसारख्या अस्थिर नेतृत्वाचा प्रभाव असू नये. बहुध्रुवीयतेच्या वाढत्या प्रभावामुळे आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या आत्मविश्वासामुळे अमेरिकेत अस्वस्थता निर्माण झाली असून, तीच अस्वस्थता व्यापारातील आक्रमकतेतून व्यक्त होत आहे. भारताने आपल्या धोरणात्मक स्वायत्ततेचा ठाम पवित्रा घ्यावा, असे आवाहन पक्षाने केले आहे. सारख्या व्यासपीठांद्वारे अमेरिकेकडे झुकण्याचे धोरण अदूरदर्शी आणि धोकादायक ठरू शकते, असा इशाराही पक्षाने दिला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, ''अस्थिर आणि स्वार्थी अमेरिकेवर विश्वासार्ह भागीदार म्हणून विसंबून राहणे भारतासाठी हितावह ठरणार नाही.'' पक्षाने भारताने दक्षिण-दक्षिण एकतेच्या दिशेने अधिक सक्रियता दाखवावी, उदयोन्मुख अर्थव्यवस्थांशी सहकार्य वाढवावे आणि लोकशाही व बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी योगदान द्यावे, असे ठाम मत मांडले आहे.

## रयत समाचारचे ज्येष्ठ सल्लागार कुमार कदम यांना मुंबई मराठी पत्रकार संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार जाहीर

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्यावतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा आचार्य अत्रे पुरस्कार यंदा ज्येष्ठ पत्रकार तथा मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष कुमार कदम यांना मिळणार आहे. तशी त्यांची निवड करण्यात आली आहे. आचार्य अत्रे यांच्या कन्या शिरीष पै यांनी दिलेल्या देणगीतून हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार आचार्य अत्रे यांच्या जयंतीनिमित्त दिला जातो. शाल, श्रीफळ, रुपये ११,०००/- आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. वृत्तपत्र क्षेत्रातील एकूण ५४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव पाठीशी असलेल्या कुमार कदम यांनी विद्यार्थीदशेत असतानाच आपल्या पत्रकारितेचा प्रारंभ केला. रविवारच्या 'लोकसत्ता'मध्ये 'ज्ञान मंदिरातील लाचखाऊंना आवरा' अशा शिर्षकाखाली सणसणीत लेख लिहून शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचार त्यांनी चव्हाट्यावर आणला. शाळांतून प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सक्तीच्या देणग्यांविरोधात सर्वप्रथम आवाज उठविण्याचे काम त्यांनी केले होते. रत्नागिरी जिल्ह्यातून प्रसिद्ध होणाऱ्या 'रत्नभूमि' या दैनिकातून १९७२ मध्ये त्यांच्या पूर्णवेळ पत्रकारितेचा आरंभ झाला. मुंबईतील वार्ताहर म्हणून दहा वर्षे त्यांनी रत्नभूमिसाठी काम केले. याच काळात 'साप्ताहिक मार्मिक'मधून महापालिकेत 'एक नजर' हे सदर त्यांनी अनेक वर्षे चालविले. आणिबाणीनंतर 'हिन्दुस्थान समाचार' या भाषिक वृत्तसंस्थेत त्यांनी १२ वर्षे वार्ताहर म्हणून काम केले. महाराष्ट्र वृत्त सेवा (महावृत्त) या संस्थेची १९९९ मध्ये स्थापना केल्यानंतर त्यांनी या संस्थेचे तसेच संस्थेच्या 'महावृत्त डॉट कॉम' या संकेतस्थळाचे मुख्य संपादक म्हणूनही जबाबदारी सांभाळली. दैनिक पुढारी (कोल्हापूर), दैनिक तरुण भारत (बेळगाव) यांचा विशेष प्रतिनिधी म्हणूनही त्यांनी मुंबईत दहा वर्षे काम पाहिले. दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स'मधील 'मराठी मुलखात कोकण' हे कोकणातील विविध



विषयांवर सडेतोड भाष्य करणारे कुमार कदम यांचे सदर प्रचंड गाजले. जुलै २००१ ते सप्टेंबर २०१४ अशी सलग १३ वर्षे स्तंभलेखक म्हणून त्यांनी सातत्यपूर्ण लिखाण केले. इतक्या दीर्घकाळ एकाच प्रांतिक विषयावर सातत्याने लिखाण करण्याचा महानगरातील मोठ्या वृत्तपत्रातील एक विक्रमही त्यांच्या नावावर आहे.

अनेक सामाजिक प्रश्नांवर आपल्या सडेतोड आणि रोखठोक लेखणीच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करणाऱ्या कुमार कदम यांनी कोकणातील रायगड येथे येवू घातलेल्या सेझ प्रकल्पाच्या धोक्याविषयीची माहिती महाराष्ट्र टाइम्सच्या ता.२२ ऑगस्ट २००५ च्या अंकातील सदरात 'महामुंबईचे महाजाल' या शिर्षकाखाली प्रसिद्ध करून या विषयाला सर्वप्रथम वाचा फोडली. सध्या ते सामाजिक स्तरावर अवयवदान विषयक जनजागृती करण्याचे व्यापक काम राज्यस्तरावर करत आहेत. शिवाय, अनेक सामाजिक उपक्रमांची धुराही ते सांभाळत आहेत. दूरदर्शनवर मराठी कार्यक्रमाची होणारी गळचेपी रोखण्यासाठी १९८३ साली मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष असताना त्यांनी मंत्रालयावर मोर्चा काढला होता. कुमार कदम यांच्या नेतृत्वातील मोर्चात सुधीर फडकेपासूंन अनेक दिग्गज त्यावेळी सहभागी झाले होते. परिणामी सह्याद्री वाहिनीवरून मराठी कार्यक्रमांना प्राधान्य मिळू लागले. ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम यांना रयत समाचार टीमकडून विशेष शुभेच्छा.



## जलजीवन मिशनसाठी पैसे द्या- मंत्री गुलाबराव पाटील

**नवी दिल्ली । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्य सरकार ग्रामीण भागात प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पिण्याचे पाणी पोहोचवण्याच्या जल जीवन मिशनच्या उद्दिष्टाला गती देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. राज्यामध्ये केलेल्या कामाचे अनुदान केंद्र शासनाने तातडीने निर्गमित करावे अशी मागणी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांच्याकडे केली. जल जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्रातील योजनांना गती देण्यासाठी आणि प्रलंबित असलेल्या भुगतानांचा निपटारा करण्यासाठी केंद्रीय अनुदानाची तातडीने गरज आहे याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी झालेल्या भेटीत सविस्तर चर्चा केली. राज्य सरकारच्या या मिशनप्रती असलेल्या कटिबद्धतेची आणि व्यापक जनहितासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची माहिती त्यांनी यावेळी केंद्रीय मंत्र्यांना दिली. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांनी या मागणीबाबत सकारात्मकता दर्शवून लवकरात लवकर निधी निर्गमित करण्याचे आश्वासन दिले. या भेटीनंतर माध्यमांशी संवाद साधताना गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, राज्याला जल जीवन मिशनसाठी रु.१०,९७२.५० कोटींच्या केंद्रीय अनुदानाची आवश्यकता आहे. यामध्ये चालू वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी अग्रिम राज्य अंश म्हणून रु.२,५८३.६१ कोटी, मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या योजनांसाठी प्रलंबित असलेली रु.६,००० कोटींची रक्कम देणे आहे. पूर्णत्वाच्या मार्गावरील १९,१२७ योजनांसाठी आवश्यक असलेली रु.१५,९४५ कोटींची निधीची गरज यांचा समावेश आहे. जल जीवन मिशनमुळे ग्रामीण भागातील जनतेचे, विशेषतः महिला आणि मुलांचे जीवनमान उंचावले आहे.

## सायबर सुरक्षेच्या दिशेने सजग पाऊल

### सायबर वॉरियर्सकडून बर्फीवाला हायस्कूलमध्ये जनजागृती अभियान

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

सायबर साक्षरतेच्या दिशेने विद्यार्थ्यांमध्ये सजगतेचे ठोस पाऊल उचलत, वालिया सी. एल. कॉलेज ऑफ कॉमर्स आणि वालिया एल.सी. कॉलेज ऑफ आर्ट्स येथील सायबर वॉरियर्स अप्सरा राऊत आणि मिश्कत सैफी यांनी एस.सी.डी. बर्फीवाला हायस्कूल येथे प्रभावी सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबवले. क्विक हिल फाउंडेशन आणि महाराष्ट्र सायबर सेल यांच्या सहकार्याने आयोजित या सत्रात सायबर बुलिंग, फिशिंग, सुरक्षित ब्राउझिंग सवयी, डिजिटल स्वच्छता अशा अत्यंत महत्त्वाच्या आणि काळानुरूप विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांनी सायबर धोके ओळखावेत, डिजिटल जगात सुरक्षितपणे



वावरावे आणि जबाबदारीने तंत्रज्ञानाचा वापर करावा, हा या सत्राचा प्रमुख उद्देश होता. या उपक्रमाचा लाभ ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी वर्गनिहाय सत्रांद्वारे घेतला. सत्रात शाळेतील शिक्षकांनीही सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादासह सत्राच्या प्रासंगिकतेचे, मुद्द्यांच्या सुस्पष्ट मांडणीचे आणि संवाद शैलीच्या प्रभावीपणाचे शिक्षकांनी विशेष कौतुक केले. हे सत्र ''सायबर शिक्षेसाठी सायबर सुरक्षा'' या व्यापक जनजागृती मोहिमेचा एक भाग होते. या मोहिमेचा उद्देश विद्यार्थ्यांना सायबर विश्वातील संभाव्य धोके समजावून सांगणे, त्यांच्यात सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना आवश्यक ज्ञान व साधनांनी सज्ज करणे हा होता. अप्सरा राऊत आणि मिश्कत सैफी यांनी स्पष्ट संवादशैली, उत्साही सादरीकरण आणि विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधण्याच्या कौशल्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबतची जाणीव अधिक ठामपणे रुजली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सजगतेची पायाभरणी घडल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

## खाजगीकरण, भाववाढ आणि घोटाळ्यांमधून बेस्ट सहीसलामत वाचविण्याची भाकपची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**




बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अ‍ॅण्ड ट्रान्सपोर्ट (बेस्ट) ही मुंबईकरांची दुसरी लाईफलाईन मानली जाते. मात्र, खाजगीकरणाच्या धोरणांमुळे, अनियंत्रित भाडेवाढ व घोटाळ्यांमुळे ही संस्था अडचणीत सापडली आहे. गुरुवारी ता. ७ ऑगस्ट रोजी बेस्टच्या स्थापनादिनानिमित्त भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय महिला फेडरेशनच्या वतीने ताडदेव व मुंबई सेंट्रल बस डेपोवर विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ताडदेव मुख्य डेपो आणि बॉम्बे सेंट्रल डेपो येथे जागोजागी खड्ड्यांचे साम्राज्य दिसून आले. कर्मचाऱ्यांशी संवाद साधल्यावर त्यांनी अनेक तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे सांगितले. बेस्टच्या सेवेतील अनियमितता, प्रचंड भाडेवाढ (५ रुपयांचे १०, १० चे २० आणि २० चे ४० रुपये), बस वेळेवर न येणे, सुट्टे पैशांचा अभाव यामुळे प्रवाशांची संख्या ३४ लाखांवरून २२ लाखांवर आली आहे. या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्य मागण्या- भाडेतत्त्वावर आधारित आर्थिक व्यवहारांचे सार्वजनिक लेखापरीक्षण करावे. बेस्टच्या आगारांची जमीन सुरक्षित ठेवावी. कंत्राटदारांकडून होणाऱ्या अटींच्या उल्लंघनावर कारवाई व्हावी. सर्व करारांची चौकशी करण्यात यावी. आझाद मैदानावर बेस्टचे निवृत्त कर्मचारी देखील थकित ६०० कोटींच्या थकबाकीसाठी आंदोलन करत आहेत. आंदोलनात कॉ. प्रकाश रेड्डी, कॉ. बाबारिया, कॉ. नरसु मच्छा, डॉ. अनुराधा रेड्डी, कॉ. नंदू मलाईकर, कॉ. सुभाष सुर्वे यांनी सहभाग घेतला.

## विधानसभेत डोंगरकापणी, बेकायदेशीर प्लॉटिंग, जमीनरूपांतरणावर जोरदार चर्चा

**पणजी । रयत समाचार**

चालू पावसाळी अधिवेशनात गोवा विधानसभेत डोंगरकापणी, बेकायदेशीर प्लॉटिंग, जमीन रूपांतरण आणि प्रादेशिक आराखडा या महत्त्वाच्या विषयांवर जोरदार चर्चा रंगली. यावेळी नगरनियोजन मंत्री विश्वजित राणे आणि विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांच्यात तीव्र शाब्दिक चकमक झाली. १००० हून अधिक बेकायदेशीर प्लॉटिंग प्रकरणांवर सरकार गप्प का? असा सवाल युरी आलेमाव यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की, ''राज्यात डोंगरकापणी आणि जमिनींच्या बेकायदेशीर प्लॉटिंगची १००० पेक्षा अधिक प्रकरणे असून, नगरनियोजन खात्याने यावर आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, ही गंभीर बाब आहे.'' यावर प्रत्युत्तर देताना मंत्री राणे यांनी सांगितले की, ''पुढील अधिवेशनाआधी आम्ही एक सखोल आणि कठोर कायदा आणत आहोत, जो डोंगरकापणी आणि बेकायदेशीर प्लॉटिंगवर बंदी घालेल. तसेच अशा प्रकरणांवर एफआरआय दाखल करणे बंधनकारक केले जाईल.'' मंत्री राणे म्हणाले की, ''पूर्वी कलम १६ ब अंतर्गत सुमारे १ कोटी चौ. मीटर जमीन रूपांतरीत करण्यात आली होती. आता हे कलम रद्द करण्यात आले आहे. सध्या कलम १७(२) नुसार सुमारे १७ लाख चौ. मीटर जमीन सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. तसेच कलम ३९ (अ) अंतर्गत ९५० अर्जांपैकी फक्त २०० अर्जांना मंजुरी मिळाली असून, त्यापैकी केवळ ३५ अर्ज अधिसूचित करण्यात आले आहेत.'' ते पुढे म्हणाले की, ''लागवडीयोग्य जमीन रूपांतरीत झालेली नाही.'' विरोधी पक्षनेते आलेमाव यांनी नव्या प्रादेशिक आराखड्याची तातडीने गरज असल्याचे मत मांडले. यावर मंत्री राणे यांनी उत्तर दिले की, ''सरकार कोणताही निर्णय घाईत घेणार नाही. कायद्याच्या चौकटीत राहूनच योग्य वेळी निर्णय घेतला जाईल.'' यावर विरोधकांनी प्रतिक्रिया देताना हा प्रतिसाद आडवळणी असल्याची टीका केली आणि सरकारवर ''मोक्याच्या जमिनींच्या रूपांतरणासाठी पायपीट करत असल्याचा'' आरोप केला. आमदार वीरेश बोरकर यांनी नेवरा गावातील बेकायदेशीर प्लॉटिंग, रस्ते, जलवाहिनी व विहिरी या नकाशात नसतानाही विकसित केल्या जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, ''या सर्व सुविधा प्रादेशिक आराखड्यात नसतानाही मोठ्या प्रमाणावर प्लॉटिंग सुरू आहे.'' यावर मंत्री राणे यांनी स्पष्ट केले की, ''नेवरा गाव 'सेटलमेंट झोन'मध्ये येतो. विभागाने आधीच तपासणी केली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम खात्याला पत्र पाठवून रस्ता अधिसूचित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.''





# मोह-माया बंधनातून मुक्त होण्यासाठी गीता ऐकणे आवश्यक- स्वामी प्रत्ययानंद सरस्वती

## सावेडीत श्रीमद् भगवत गीता ज्ञानयज्ञास प्रारंभ

**अहमदनगर । विजय मते**

जन्माचे मूळ शोधले की, माया ही माता आहे हे समजते. या मातेपासून सृष्टीची निर्मिती झाली असली, तरी ८४ लक्ष योनी भगवंतापासून निर्माण झाल्या आहेत. बंधनांची कारणे शोधली, की उपायही सापडतो आणि त्या बंधनातून मुक्ती मिळते.

मोह-माया या बंधनातून मुक्त होण्यासाठी भगवद्गीतेचे श्रवण आवश्यक आहे, असे मार्गदर्शन नांदेड येथील स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी केले. चिन्मय मिशन, अहिल्यानगर शाखेच्या वतीने श्रीकृष्ण नगर, पाईपलाईन रोडवरील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या श्रीमद् भगवत गीता ज्ञानयज्ञामध्ये स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी अध्याय १४ चे विवेचन करताना हे विचार मांडले. या प्रसंगी चिन्मय मिशन, नगर शाखेचे अध्यक्ष ॲड. धोंडीराम घोरपडे, खजिनदार देवराम मोरे, कोषाध्यक्ष उत्तम साळुंखे, शिवाजी ढोले, रामचंद्र शिर्के, खंडेराव मगर, हभप विद्याताई हारदे आदी मान्यवर उपस्थित होते. श्रावण मासानिमित्त सुरू असलेल्या या ज्ञानयज्ञात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होत आहेत. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी गीतेतील सत्वगुण, रजोगुण व तमोगुण यांचे सविस्तर विवेचन करताना सांगितले की, सकाळी सत्वगुण, दिवसभर रजोगुण व रात्री तमोगुण स्वीकारावा, पण शक्यतो सत्वगुणात राहण्याचा प्रयत्न करावा. स्वामीजींनी पुढे सांगितले की, जी माणसे बंधनात अडकलेली असतात, ती पोपटासारखी पिंजऱ्यात राहतात. जी माणसे घराबाहेर पडत नाहीत, ती जणू तुरुंगात राहतात. काही लोक कबुतरासारखे असतात त्यांना मोकळे सोडले तरी ते परत येतात. पण जे साधुसंत असतात, ते गरुडासारखे असतात एकदा झेप घेतली की, कधीच परत बंधनात अडकत नाहीत. गीता हे अशा बंधनातून मुक्त होण्यासाठीच आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या सात दिवसीय प्रवचन सप्ताहात दररोज सकाळी साडेसात ते साडेआठ यावेळेत प्रवचने होत आहेत. यामध्ये कठोपनिषदातील नचिकेत आणि यमधर्म यांचा संवाद रूपकातून आत्मस्वरूपाचे विशद विवेचनही स्वामीजींनी केले. आत्मा कसा असतो? मेल्यानंतर जीव कुठे जातो? याचे साधे व समजण्याजोगे भाष्य त्यांनी केले.

# अहमदनगर महाविद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत



**अहमदनगर । रयत समाचार**

गेल्या ७५ वर्षांहून अधिक काळ गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपणाऱ्या बी.पी.एच.ई. सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयात नुकताच इयत्ता ११ वीमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला.

यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाने ११ वी प्रवेशासाठी केंद्रीकृत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवली असून, या प्रक्रियेच्या माध्यमातून महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. हा समारंभ कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. यावेळी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभाची सुरुवात सुमधुर स्वागत गीताने करण्यात आली.

या प्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्णबस, सचिव विशाल बार्णबस, प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, तसेच रजिस्टार कल्पलता भिंगारदिवे आदी मान्यवर उपस्थित होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रतुल कसोटे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून, महाविद्यालयाच्या उल्लेखनीय वाटचालीचा आढावा उपस्थितांना दिला. संस्थेचे सचिव विशाल बार्णबस यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरा, शिस्त व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध संधी यावर प्रकाश टाकला. तसेच भविष्यात राबवण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक प्रकल्पांची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमात शिक्षकांनी पालक आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला.

पालकांनीही संवाद साधत महाविद्यालयाच्या उपक्रमशीलतेचे आणि व्यवस्थापनाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मार्शनील स्वामी आणि प्रा. वर्षा पटेकर यांनी केले, तर प्रा. सुलक्षणा गायकवाड यांनी आभारप्रदर्शन केले. संपूर्ण समारंभात उत्साही वातावरण होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवीन वाटचालीची उमेद आणि आत्मविश्वास स्पष्टपणे दिसून येत होता.

# नांगरून ठेवलेल्या रस्त्यांच्या खड्ड्यातच सण साजरे करायचे का?

## काँग्रेसचे दीप चव्हाण यांची मनपाला मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

''शहरातील रस्त्यांची अवस्था इतकी दयनीय आहे की, खड्ड्यांमध्येच आता सण साजरे करावे लागतील काय?'' असा रोखठोक सवाल काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष व माजी नगराध्यक्ष दीप चव्हाण यांनी महापालिका प्रशासनाला केला आहे.

सणासुदीच्या पार्श्वभूमीवरही रस्त्यांची दुर्दशा कायम असून, गोकुळाष्टमीपूर्वी रस्त्यांचे पॅचिंग तातडीने करावे, अशी मागणी त्यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना पत्राद्वारे केली आहे. शहरातील अनेक रस्ते उखडून टाकण्यात आले असून, त्यांचे काम अर्धवट सोडले गेले आहे. त्यामुळे बाजारपेठा ओस पडल्याचे चित्र आहे. याच रस्त्यांवरून मेहतर समाजाची पवित्र काठी मिरवणूक तसेच गोकुळाष्टमीची पारंपरिक मिरवणूक निघते. मात्र, सध्याच्या अवस्थेमुळे या सणांवर संकट निर्माण झाले आहे. दीप चव्हाण यांनी आरोप केला की, ''शहरात दीडशे कोटी रुपये रस्त्यांवर खर्च केल्याचे गाजवले गेले, पण प्रत्यक्षात अनेक रस्ते खड्डेमय अवस्थेत आहेत. निधी नाही, असे कारण देत कामे थांबवण्यात आली. मग विधानसभा निवडणुकीसाठी साधनसंपत्ती उभी करता आली, तर रस्त्यांसाठी निधी का नाही?'' पालिकेत सध्या प्रशासकाचे राज्य असले, तरी लोकप्रतिनिधींनी गप्प बसायचे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ''गेल्या तीन वर्षांत एकाही सणाला रस्त्यांचे पॅचिंग झाले नाही. आम्ही नवीन रस्त्यांची नाही, तर फक्त पॅचिंगची मागणी करत आहोत. शहरवासीयांना सणासुदीचे क्षण खड्ड्यांमधून वाट काढत साजरे करावे लागत आहेत. गोकुळाष्टमी, बैलपोळा, गणपती हे सण या खड्ड्यात उभे राहून साजरे करायचे का? याचा कोणीही विचार करत नाही, ही शोकांतिका आहे,'' अशी तीव्र प्रतिक्रिया चव्हाण यांनी व्यक्त केली.

# भाऊसाहेब फिरोदियाचे मुख्याध्यापक दुगड आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने गौरव

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापके उल्हास पोपट दुगड यांना जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने गौरविण्यात आले. अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात शिक्षण विस्तार अधिकारी अभयकुमार वाव्हळ, गणित अध्यापक महामंडळाचे सल्लागार जनार्दन मुंढे, मच्छिंद्र वीर व गणित अध्यापक महामंडळाचे राज्य अध्यक्ष संजय निक्रड यांच्या हस्ते मुख्याध्यापक दुगड यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, जिल्हा गणित मंडळाचे अध्यक्ष नवनाथ घुले, माध्यमिक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे, कल्याण ठोंबरे आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते. उल्हास दुगड हे २०१५ पासून भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळत आहे. त्यांनी विविध उपक्रमाद्वारे शाळेतील



कला, क्रीडा व शैक्षणिक उपक्रमाला चालना देण्याचे काम केले आहे. विविध क्षेत्रात शाळेचे गुणवंत विद्यार्थी चमकत आहे. सातत्याने गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे कार्य सुरू असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कला, क्रीडा व शैक्षणिक स्पर्धा परीक्षांमध्ये अनेक विद्यार्थी चमकले आहेत. तर जिल्ह्यात उज्वल निकालाची परंपरा त्यांनी कायम राखलेली आहे. या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच दुगड हे उत्कृष्ट खेळाडू असून त्यांनी राज्य राष्ट्रीय क्रीडा प्रकारात एकूण २९ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कास्य पदके पटकाविले आहेत. २००६ मध्ये मलेशिया येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते. यापूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हा क्रीडा पुरस्कार, राज्यशिक्षक पुरस्कार व पॅरोलैम्पिक संघटनेचा साफल्य हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, तसेच उपमुख्याध्यापक कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, कल्पना पाठक, वैभव कुलकर्णी व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# संविधानावर मनुवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी संविधानवादी कार्यकर्त्यांची बैठक

**अहमदनगर । रयत समाचार**

सध्या देशात आणि राज्यात घडणाऱ्या घटनांचा विचार करता भारताच्या आदर्श संविधानावर वारंवार होत असलेल्या मनुवादी हल्ल्यांमुळे गंभीर अराजकतेची स्थिती निर्माण होत चालली आहे.

महाराष्ट्रात जातीयतेचे विष पेरले जात असून, देशाच्या अखंडतेला गालबोट लागण्याची शक्यता आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर, साठे, या थोर महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित संविधानवादी कार्यकर्त्यांवर दडपशाही केली जात असून, जनसुरक्षेच्या नावाखाली आंदोलनांना दडपवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, मातंग आदींसह आदिवासी समाजांवर हिंदुत्वाच्या नावाने हल्ले वाढले असून, विरोध करणाऱ्यांना काळ फासण्याचे प्रकार सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर संविधानवादी विचारधारेचे कार्यकर्ते, संघटनांचे पदाधिकारी व विचारवंत यांनी एकत्र येणे गरजेचे झाले आहे. या उद्देशाने येत्या रविवारी दुपारी २ वाजता, अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहात एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस प्रमुख मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत सद्यस्थितीचा आढावा घेऊन भविष्यातील लढ्याची दिशा ठरवली जाणार आहे. त्यामुळे सर्व संविधानवादी कार्यकर्त्यांनी या बैठकीस उपस्थित राहावे आणि आपल्या मोलाच्या मार्गदर्शनाने संविधान रक्षणाच्या या लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# क्रांतिगुरू लहूजी वस्ताद साळवे व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पूर्णाकृती पुतळ्यांसाठी १० ऑगस्ट रोजी महत्त्वपूर्ण बैठक



**अहमदनगर । रयत समाचार**

आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे व साहित्यरत्न, लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांच्या उभारणी संदर्भात प्रस्तावावर सखोल चर्चा करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक ता. १० ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सिद्धार्थनगर येथील साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे चौकाजवळील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत होणार आहे. या बैठकीत सकल मातंग समाज, विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते, तसेच लहू सैनिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, लहुजी वस्ताद साळवे व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या सन्मानार्थ शहरात पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी कशी करता येईल, यावर व्यापक चर्चा होणार आहे. बैठकीनंतर पूर्णाकृती पुतळा समिती स्थापन करण्यात येणार असून, ही समिती पुढील नियोजन, शासकीय परवानग्या, निधी संकलन, जागा निश्चिती व मूर्तीकार निवड यांसारख्या महत्त्वाच्या टप्प्यांवर काम करणार आहे. या ऐतिहासिक उपक्रमात सर्व समाजबांधवांनी सक्रिय सहभाग घ्यावा, आपल्या उपस्थिती व मार्गदर्शनाने या उपक्रमास बळ द्यावे, असे आवाहन सकल मातंग समाज यांनी केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

हरवले आहेत

श्री.धनराज मोहन नेटके
आढळल्यास संपर्क करा
गणेश पेटारे
७३८७५६५४६७
किरण नेटके
९०११०३७८४७

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# अजित पवार यांच्या उपस्थितीत संत शेख महंमद महाराज समाधी मंदिर निर्माण कृती समितीची बैठक

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या सद्गुरु संत शेख महंमद महाराज समाधी मंदिराच्या निर्माण कार्यातील अडथळे दूर करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, ता. १३ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती समाधी मंदिर निर्माण कृती समितीचे निमंत्रक घनशाम शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. सन १९५३ मध्ये सह धर्मदाय आयुक्त, अहिल्यानगर यांच्याकडे इ. ७१ अन्वये श्री शेख महंमद बुवा देवस्थान, श्रीगोंदा या नावाने न्यासाची नोंद झाली होती.



मात्र १९९७ मध्ये अमीन शेख यांनी चेंज रिपोर्टद्वारे न्यासाचे नाव व उद्दिष्ट बदलून 'शेख महंमद बाबा दर्गा ट्रस्ट' असे नामकरण केले. यानंतर सह धर्मदाय आयुक्तांची कोणतीही परवानगी न घेता, ट्रस्टची नोंदणी महाराष्ट्र वक्फ बोर्डाकडे करण्यात आली. या बोर्डाकडे प्रामुख्याने मस्जिद व दर्ग्यांचीच नोंद केली जाते, परंतु या ठिकाणी संत महाराजांचे समाधी मंदिर असून, त्यामुळे या नोंदणीला भाविकांनी बेकायदेशीर म्हटले आहे.

या नोंदणीमुळे 'मंदिर' हा शब्द दस्तऐवजांतून वगळला जाण्याची शक्यता असून, मंदिर जिर्णोद्धारात अडथळा निर्माण झाला आहे. या प्रश्नावर उपाय मिळावा म्हणून १७ एप्रिल २०२५ रोजी भव्य मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी श्रीगोंदा शहरातील व्यापाऱ्यांनी दोन दिवस दुकाने बंद ठेवून पाठिंबा दर्शवला होता. त्यानंतर २८ एप्रिलपर्यंत धरणे आंदोलन आणि २४ जुलै रोजी मंदिरात लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या आंदोलनानंतर शासन आणि न्यायालयीन पातळीवर मार्ग काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर ५ ऑगस्ट २०२५ रोजी मा. आ. राहुल जगताप, राजेंद्र नागवडे (चेअरमन, नागवडे साखर कारखाना), दत्तात्रय पानसरे (राज्य पणन मंडळाचे चेअरमन), अण्णासाहेब शेलार (उपाध्यक्ष, जिल्हा परिषद), बाळासाहेब नाहाटा (राज्य बाजार समितीचे चेअरमन), भगवानराव पाचपुते (तालुकाध्यक्ष) आदींच्या शिष्टमंडळासह घनशाम शेलार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेनंतर १३ ऑगस्ट २०२५ रोजी बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या बैठकीत समाधी मंदिराच्या जिर्णोद्धारातील अडथळा दूर करण्यासाठी ठोस आणि सकारात्मक तोडगा निघेल, असा विश्वास शेलार यांनी व्यक्त केला आहे.



# शहरातील जड वाहतूक बंद करणार- विखे

## प्रांताधिकारी सावंत यांनी निवेदनास दाखविली केराची टोपली

**श्रीरामपूर – रयत समाचार**

शहरातील खिलारी वस्ती, कांदामार्केट, कौशल्यनगर या रहिवाशी परिसरातून भरघाव वेगाने जाणाऱ्या जडवाहनांबाबत संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा करून ही रहदारी त्या भागातून बंद करण्याचे आश्वासन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिले.

डॉ.विखे यांची या परिसरातील नागरिकांनी भेट घेऊन निवेदन दिले. त्यावेळी खिलारी वस्ती, कांदा मार्केट व कौशल्यानगर भागातून भरघाव वेगाने खडी, मुरूम व इतर गौण खनिज वाहतूक करणारी जडवाहने रात्रंदिवस जातात. त्यामुळे या भागातील रस्त्यावर खड्डे पडले असून पायी जाणे मुश्किल झाले असल्याचे नागरिकांनी सांगितले. या भागात दोन हॉस्पिटल, मंदिर, मंगल कार्यालय, बँक, विद्यार्थ्यांची क्लासेस व रहिवासी भाग असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

यासंदर्भात आम्ही प्रांताधिकारी किरण सावंत यांची भेट घेतली असता त्यांनीही निवेदनास केराची टोपली दाखवून याबाबत काहीही कारवाई केली नसल्याचे सांगितले. तसेच पोलीस अधिकारी यांनाही समक्ष भेटून या परिसराची कैफियत मांडली व निवेदन दिले, तरी आजपर्यंत या वाहनांवर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले. वाहतूक करणाऱ्या या जड वाहनांमधील काही स्टोन क्रेशर बेकायदेशीर चालू असल्याचे राजेंद्र पानसरे यांनी म्हटले. या जड वाहनामुळे मोठा अपघात होऊ शकतो.

या वाहनांसाठी दुसरा पर्यायी मार्ग असून त्या मार्गे वाहतूक वळवावी असे म्हटले आहे. यापुढील काळात जड वाहने या भागातून जावू नयेत याकरिता बंदी घालावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी सदरचा प्रश्न गंभीर असून या संदर्भात आपण संबंधित अधिकारी यांच्याशी बोलून प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन नागरिकांना दिले. यावेळी राजेंद्र पानसरे, माजी मुख्याध्यापिका पुष्पा शिंदे, इंदूताई नन्नवरे, सचिन जगताप, भरत कोठारी, नामदेव नन्नवरे, ऋषिकेश नवले, मोहन कोऱ्हाळे, वसंत गागरे, संजय सोनार, सोमनाथ निर्मळ सर, अमोल जोशी, योगेश गंगवाल, सुभाष मुरकुटे, डॉ. महेश क्षीरसागर, डॉ. गणेश जोशी, वाल्मीक सरोदे, जयवंत वाघचौरे, संपत देशमुख, संदीप दोडकर, नंदलाल गंगवाल, पेटकर, कोल्हे सर, सोपानराव लबडे, बाबासाहेब थोरात, दिलीप डोखे, सुहास धनीधर, रवींद्र कांबळे, दिनेश कुलकर्णी, शंकर आव्हाड, रमेश नवले आदी उपस्थित होते.

# शाश्वत शेतीच्या माध्यमातून हरितक्रांतीची संकल्पना डॉ. स्वामिनाथन यांनी मांडली– डॉ. गोरक्ष ससाणे

## राहुरी विद्यापीठात शाश्वत शेती दिन साजरा

**राहुरी । रयत समाचार**

भारतरत्न डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांचा जन्मदिवस 'शाश्वत शेती दिन' म्हणून साजरा केला जात आहे. त्यांनी संशोधनातून गहू व भाताचे उच्च उत्पादकतेचे वाण विकसित केले. या वाणांमुळे देशात हरित क्रांती झाली, अन्नधान्यात स्वयंपूर्णता आली व आर्थिकदृष्ट्या भारत सक्षम झाला. यानंतर पर्यावरणाचा ऱ्हास टाळून जैवविविधतेचे संरक्षण करत त्यांनी शाश्वत शेतीची संकल्पना मांडली. हरित क्रांतीतून सदा हरित क्रांती ही त्यांची दूरदृष्टी होती, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले.




महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी; कृषि विभाग, महाराष्ट्र शासन; व कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने कोंढवड (ता. राहुरी) येथे डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'शाश्वत शेती दिन' कार्यक्रमाचे आयोजन श्री. दत्तात्रय केशव म्हसे यांच्या प्रक्षेत्रावर करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. ससाणे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. पवन कुलवाल, डॉ. आनंद चवई, डॉ. मंगेश बडगुजर, डॉ. नंदकुमार भुते, बापूसाहेब शिंदे, पांडुरंग म्हसे, उत्तमराव म्हसे, तसेच प्रगतशील शेतकरी साहेबराव म्हसे व दत्तात्रय म्हसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बापूसाहेब शिंदे (तालुका कृषि अधिकारी) यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई तर आभार प्रदर्शन श्री. अशोक गिरगुणे यांनी मानले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी शेतावर भेट देऊन प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. कोंढवड पंचक्रोशीतील व पद्मावती शेतकरी गटातील शेतकरी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

# जीवन सार्थकी करण्यासाठी संत संगतीत राहणे गरजेचे– हभप भवार महाराज

**शेवगाव । ऋषिकेश काळे**



"जीवन सार्थकी होण्यासाठी संतांच्या संगतीत राहणे, भजन, कीर्तन, पारायण यासारख्या गोष्टींचा अंगीकार करणे आवश्यक आहे. वै. नारायण बाबांनी आपले अखंड जीवन भजन आणि अभंगसेवेत व्यतीत केले. ते खरे अर्थाने वारकरी संप्रदायाचे तेजस्वी दीप होते," असे विचार हभप. लक्ष्मण महाराज भवार (कळसपिंपरी) यांनी व्यक्त केले. लोळेगाव (ता. शेवगाव) येथील आळंदी-पंढरपूरच्या वारीचे निष्ठावान वारकरी हभप. वै. नारायण बाबा काळे यांच्या चतुर्थ पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी हभप. लक्ष्मण महाराज भवार यांचे जाहीर हरिकीर्तन झाले. महाराजांनी अभंग "नाम वाचे श्रवण कीर्ती, पाउले चित्तीं समान" याच्या माध्यमातून पांडुरंग नामस्मरणाचे आणि भक्तीमार्गाचे महत्त्व स्पष्ट करत सांगितले की, "भगवंताचे नाम जपणे, त्याची कीर्ती ऐकणे, त्याचे चिंतन करणे आणि त्याच्या चरणांची ओळख ठेवून त्याच्याशी आत्मिक एकरूपता साधणे हाच खरा जीवनाचा सार्थक मार्ग आहे." पुण्यतिथीनिमित्त काळे कुटुंबाच्या वतीने महाप्रसादाची पंगत आयोजित करण्यात आली होती. या पंगतीचे आयोजन सरपंच भानुदास काळे आणि बाबासाहेब काळे यांनी केले. या कार्यक्रमाला नामदेव महाराज जाधव, दत्तू केदार, सुखदेव विधाटे, गोटीराम ढगे, महादेव गोरे, विठ्ठल डोंगरे, मृदुंगाचार्य विश्वास नवघरे, बहिरनाथ काळे, चंद्रकांत वाघ, महेंद्र मेरड, सुभाष जाधव, बबनराव ठुबे, दत्तात्रय विधाटे आदी मान्यवर उपस्थित होते. यासोबतच जोहरापूर, देवटाकळी, वडुळे, लोळेगाव येथील भजनी मंडळ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# संजीवनीमध्ये माजी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाने नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत

**कोपरगाव । किसन पवार**

"गुरूंच्या योग्य मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांची प्रगती शक्य होते. मी संजीवनीमधून शिक्षण घेतले आणि आज देशातील एकूण ११ अणुभट्ट्यांवर काम करण्याची संधी मला मिळाली. हीच संजीवनी संस्थेची खरी देणगी आहे," असे उद्गार टेक्नोफ्लो ग्रीन इक्विपमेंट्स प्रा. लि. (नाशिक) कंपनीचे जनरल मॅनेजर व संजीवनीचे माजी विद्यार्थी चंदन शिरसाठ यांनी व्यक्त केले. संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निक, कोपरगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी उत्साहात स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात शिरसाठ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय भाषणात अमित कोल्हे म्हणाले, "पदवी फक्त पात्रता देते, पण कौशल्ये रोजगाराचे खरे साधन आहेत. संजीवनीमध्ये तांत्रिक शिक्षणासोबतच जपानी, कोरियन,




जर्मन व फ्रेंच भाषांचे प्रशिक्षण दिले जाते, जे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर संधी उपलब्ध करून देण्यासाठी उपयुक्त आहे.

या प्रसंगी संस्थेचे आणखी एक माजी विद्यार्थी व सध्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे शिक्षण घेत असलेले रितेश औताडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोग्रॅमिंग आणि व्यावहारिक ज्ञान घेण्याचा सल्ला दिला. त्यांनी संजीवनी संस्थेतील शिक्षणाचा उपयोग वास्तव जीवनात कसा होतो, याविषयी अनुभव सांगितले. प्रारंभी प्राचार्य ए. आर. मिरीकर यांनी सर्वांचे स्वागत करत संस्थेची ४३ वर्षांची यशस्वी वाटचाल आणि संस्थेची शैक्षणिक परंपरा यावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना जागरूकता, सकारात्मकता, उत्तम ओळख व नवतंत्रज्ञानाची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले. आपल्या भाषणात प्रमुख पाहुणे शिरसाठ यांनी संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करत, "त्यांच्या प्रेरणेमुळे ग्रामीण भागात तांत्रिक शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. आज त्यांच्या विचारांचा वारसा अध्यक्ष नितीन कोल्हे व ट्रस्टी अमित कोल्हे समर्थपणे पुढे नेत आहेत," असे गौरवोद्गार काढले. "युवा शक्ती ही देशाचा आत्मा आहे. भविष्यात यश मिळवण्यासाठी वेगळेपणा सिद्ध करणे, समस्या सोडवण्याची क्षमता आणि अखंड शिकण्याची वृत्ती अत्यंत महत्त्वाची आहे," असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आय. के. सय्यद यांनी केले, तर प्रा. डी. ए. पाटील यांनी आभारप्रदर्शन केले. विद्यार्थी आणि पालकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# नगरपालिका गाळेभाड्यात ७५% ची वाढ

## करारनामा करणाऱ्या गाळेधारकांनाच गाळे मिळणार

**श्रीरामपूर । रयत समाचार**

शहरातील नगरपालिकेच्या गाळेधारकांना गेल्या अकरा वर्षांमध्ये गाळेभाड्याचे नूतनीकरण न झाल्यामुळे ठरलेल्या नियमानुसार दर तीन वर्षाला २५% भाडेवाढ अपेक्षित असल्याने यावेळी ७५ टक्के भाडेवाढ करून गाळ्याचे नवीन करारनामे करण्यात येणार असल्याचे नगरपालिकेने म्हटले आहे. नगरपालिकेचे या निर्णयामुळे शहरातील पालिकेच्या गाळेधारकांमध्ये खळबळ उडाली आहे. अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे आधीच श्रीरामपुरातील बाजारपेठ उद्ध्वस्त झाली आहे. त्यात नगरपालिकेची ही ७५ टक्के भाडेवाढ म्हणजे गाळेधारकांवर मोठा बोजा पडणार आहे. मागील अकरा वर्षात पालिकेने करारनामाची नोंदणीकरण केले नाही त्यामुळे नगरपालिकेला सुद्धा आपली जबाबदारी झटकता येणार नाही. पालिकेने फक्त २५% भाडेवाढ करावी अशी मागणी गाळेधारकांनी केली आहे. श्रीरामपूर नगरपरिषद हद्दीतील महाराष्ट्र नगरपरिषदा औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ व पोटकलम २ सह, महाराष्ट्र नगरपरिषदा स्थावर मालमत्ता हस्तांतरण १९८३ मधील, नियम ९/२ चे तरतुदीनुसार गाळाभाडे निश्चित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार ता.२७/०६/२००१ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशाखाली त्रिसदस्य समितीच्या बैठकीत निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार सहा.संचालक नगररचना /अहिल्यानगर यांच्याकडील पत्र. नपप्र./श्रीरामपूर/भाडेनिश्चती/दु.के./ससअ./ता.०८/०१/२०१४ अन्वये फेर मुल्यांकन केल्याचे दिसून येते परंतु स्थायी निर्देश २४ नुसार दर ३ वर्षानी २५% भाडे वाढ करणे अपेक्षित होते. परंतु मागील ११ वर्षामध्ये फेर मुल्यांकन झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सन २०२५-२६ या वर्षी ७५% भाडेवाढ करण्यात येत आहे. सद्यस्थितीत ज्या गाळेधारकांनी




नगरपालिकेचा गाळा भाडेतत्वानुसार ताब्यात देण्यात आलेला आहे त्या गाळेधारकांना नगरपरिषदेच्या वतीने नोटीसाद्वारे करारनामे मागविण्यात येणार आहे. गाळेधारक यांनी येथून पुढे ३ वर्षासाठी नगरपरिषदेकडील नोटीस मिळताच १५ दिवसाच्या आत जे गाळेधारक करारनामा सादर करतील त्याच गाळेधारकांना गाळा देण्यात येईल व जे गाळाधारक मुदतीत करारनामा नगरपरिषदेकडे जमा करणार नाही अश्या गाळे धारकांकडून गाळ्यांचा ताबा घेण्यात येईल व सदर गाळ्यांचा फेरलिलाव करून गाळे भाडेतत्वावर ३ वर्षाच्या मुदतीसाठी देण्यात येईल. असेही नगरपालिकेने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान नगरपालिकेच्या या निर्णयाबद्दल गाळेधारकांनी नाराजी व्यक्त करून ही वाढवलेली रक्कम रद्द करावी, अशी मागणी केली आहे.

# विनोदसम्राट शाहीर दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती.



सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

१९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली.

सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली.

आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# कृषी महाविद्यालयात शाश्वत शेती दिन उत्साहात साजरा

**सोनई । विजय खंडागळे**

मुळा एज्युकेशन सोसायटीचे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नित कृषी महाविद्यालय, सोनई येथे भारतीय हरित क्रांतीचे जनक भारतरत्न डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शाश्वत शेती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. प्रास्ताविकात डॉ. अतुल दरंदले यांनी डॉ. स्वामिनाथन यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास उलगडून सांगितला. यावेळी विद्यार्थ्यांनीही शाश्वत शेती दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थिनी ऋतुजा डोंगरे हिने ''शाश्वत शेती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन'' यांची सांगड महत्त्वाची असल्याचे मत मांडले. वरूण गारुळे या विद्यार्थ्याने, शाश्वत शेती ही प्रेरणास्थान ठरावी व त्यात तरुणांचा सक्रिय सहभाग अत्यंत गरजेचा असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. योगिनी गागरे यांनी, ''शेती हा केवळ व्यवसाय नसून ती जीवनशैली आहे, म्हणून आपण शाश्वत शेतीकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला हवे,'' असे मत व्यक्त केले.


प्रा. सोमनाथ दरंदले यांनी, ''शाश्वत हा शब्द केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता, आपल्या दैनंदिन जीवनातही शाश्वती आणण्याची गरज आहे,'' असे स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. हरी मोरे यांनी डॉ. स्वामिनाथन यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांनी ''एव्हरग्रीन रेव्होल्युशन'' (सदा हरित क्रांती) या संकल्पनेची माहिती दिली व भारतीय शेतीतील तसेच शाश्वत शेतीतील त्यांचे महत्त्वाचे योगदान अधोरेखित केले. शाश्वत शेती म्हणजे काय आणि ती शेतकऱ्यांच्या जीवनात कशी परिवर्तन घडवू शकते, यावर त्यांनी सविस्तर भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष चौगुले यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सुजाता पेरणे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी दिल्ली इंदिरा भवन येथे ‘व्होट चोरी’ या विषयावरील राहूल गांधी यांच्या पत्रकार परिषदेची क्षणचित्रे




















## मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांचा खुलासा




''राहुल गांधी यांनी केलेले दावे दिशाभूल करणारे आहेत. जर त्यांच्या वक्तव्यात तथ्य असेल, तर त्यांनी १९६० मधील मतदार नोंदणी नियमांच्या कलम २०(३)(ल) नुसार शपथपत्र सादर करावे, जेणेकरून कायदेशीर प्रक्रिया सुरू करता येईल.''

**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र**